# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-08.04.2026** **वार- बुधवार**

---

**युद्धविराम**

अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धविरामाचं भारतानं स्वागत केलं आहे. यामुळं पश्चिम आशियामध्ये चिरस्थायी शांतता प्रस्थापित होईल आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून नौकानयन आणि जागतिक व्यापाराचा मुक्त संचार सुरळीत होईल अशी आशा परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात व्यक्त केली आहे. सध्या सुरू असलेला संघर्ष लवकरात लवकर संपवण्यासाठी आणि तणाव कमी करण्यासाठी, संवाद आणि मुत्सद्देगिरी आवश्यक आहे, असं मंत्रालयानं म्हटलं आहे. या संघर्षामुळे लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला असून जागतिक ऊर्जा पुरवठा आणि व्यापार जाळं विस्कळीत झालं आहे, असंही त्यात म्हटलं आहे.

इराणमधील वेगानं बदलणारी परिस्थिती लक्षात घेता, इराणमधील भारतीय दूतावासानं सध्या इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना, दूतावासाच्या समन्वयानं आणि दूतावासाने सुचवलेल्या मार्गांचा वापर करून लवकरात लवकर इराणमधून बाहेर पडण्याचा सल्ला दिला आहे. दूतावासाशी पूर्व सल्लामसलत आणि समन्वय साधल्याशिवाय कोणत्याही आंतरराष्ट्रीय भू-सीमेजवळ जाण्याचा प्रयत्न करू नये असंही या सल्ल्यामध्ये म्हटलं आहे.

**RBI**

रिझर्व बँकेच्या पतधोरण समितीच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षातल्या पहिल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज घोषणा केली. रिझर्व बँकेनं रेपोदरात कोणताही बदल नं करण्याचा महत्वाचा निर्णय घेतला असून, तो पूर्वीइतकाच म्हणजे सव्वा पाच टक्के राहणार आहे. आर्थिक वर्ष 2026 मध्ये आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 6 दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून वर्षं 2027 मध्ये तो 6 पूर्णांक 8 दशांश राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळं, महागाई वाढण्याची शक्यता मल्होत्रा यांनी व्यक्त केली. पुरवठा साखळी भक्कम करण्यासाठी आणि व्यवसाय सुलभतेकरिता रिजर्व बँकेनं अनेक पावलं उचलल्याची माहिती मल्होत्रा यांनी दिली.

**MNGL**

पुणे महानगरपालिकेत महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड म्हणजे MNGL संदर्भात महापौर मंजुषा नागपूरे यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीदरम्यान महापौरांनी, अद्याप गॅस पाइपलाइन सेवा उपलब्ध नसलेल्या भागांना प्राधान्यानं सेवा देण्याच्या सूचना दिल्या तसंच सुरू असलेली कामे वेळेत पूर्ण करण्यासह नागरिकांना येणाऱ्या अडचणी तात्काळ सोडविण्याचे निर्देश दिले.

**प्रशिक्षण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर शहरात व्यापक तयारी सुरू केली आहे. अचूक, पारदर्शक आणि प्रभावी जनगणना पार पाडण्यासाठी महापालिकेच्या वतीनं प्रगणक आणि पर्यवेक्षकांसाठी ६ ते ११ एप्रिल दरम्यान क्षेत्रीय प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनात विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. जनगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून दरम्यान राबवण्यात येणार असून, या टप्प्यात घरगुती सर्वेक्षण केलं जाईल.

**<u>आरटीओपुणे</u>**

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं,२०२५-२६ या आर्थिक वर्षात महसूल वसूली, अंमलबजावणी आणि अनुषंगिक कामकाजाबाबत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शासनाने निर्धारित केलेल्या १,८९५ कोटी १७ लाख रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत कार्यालयाने १,९२२कोटी १२ लाख रुपये महसूल वसूल करत १०१ पूर्णांक ४२ टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली आहे. रस्ता सुरक्षा तपासणी, थकीत मोटार वाहन कर ,नवीन वाहनांची नोंदणी, पसंती क्रमांक आरक्षण तसंच एच एस आर पी नंबर प्लेट यातून हा महसूल मिळविण्यात आला.

**<u>शाळा</u>**

महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला आदरांजली म्हणून पुणे जिल्हा परिषदेनं पुरंदर तालुक्यातील खानवडी इथं 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळा' स्थापन केली आहे. महात्मा फुले यांच्या १९९ व्या जंयत्तीनिमित्त आणि २०० व्या वर्षपुर्तीच्या प्रारंभानिमित्त ११ एप्रिलला शाळेचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे.

**<u>आंबेडकर</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं ११ ते १६ एप्रिल दरम्यान भीमसृष्टी स्मारक इथं क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले तसच भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्वाचं आयोजन करण्यात आलं आहे. महानाट्य, शाहिरी जलसा, गीत-नृत्य, काव्यसंमेलन आणि चर्चासत्र असे कार्यक्रम यात होणार आहेत.

**<u>कऱ्हाडे</u>**

शताब्दीकडे वाटचाल करीत असलेल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेच्या कार्यकारिणीची २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. अध्यक्षपदी अमित शहाणे तर उपाध्यक्षपदी गिरीष शेवडे यांची निवड करण्यात आली आहे. १९३० साली स्थापन झालेला हा संघ २०३० शताब्दी वर्ष म्हणून साजरं करणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश निरभ्र राहील. कमाल 36 तर किमान 21 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**